<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. – २</u>

<u>नि.दि.दा.क्र. ७३/२०२३</u>

यादवराव विरुध्द मनोहर

मी शपथपूर्वक खरे सांगतो की

निशाणी – ३२

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री पुडके यांच्यातर्फे –**

५. यादवराव दुधुके माझा दिर लागतो, ललीता माझी जाउ आहे, जागो माझा दिर आहे. यादवराव यांचे घर कोणत्या वर्षी बांधले हे आता मला लक्षात नाही. त्या घराची लांबी रूंदी मी सांगू शकत नाही. घर बांधताना ग्रामपंचायतीची बांधकाम परवानगी घेतली होती का याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की कोणतीही परवानगी न घेता बांधकाम केल्याने हे बांधकाम बेकायदेशीर आहे. हे म्हणणे खरे नाही की मनोहर बावणे व यादवराव यांच्या घराच्या मध्ये सहा फूटाची गल्ली असल्याचे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की त्या गल्लीतून मी नळाचे पाणी आणत होते हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घरातील व मनोहर बावणे यांच्या घरातील लोक त्याच गल्लीनी ये–जा करीत होते हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरेनाही की यादवराव यांनी गल्लीतील रस्ता बंद केला असे कधीही घडले नाही. हे म्हणणे खरे आहे की मनोहर बावणे याला घरकूल योजनेतून घर मंजूर झाले. हे म्हणणे खरे आहे की मनोहर बावणे यांचे त्या मंजूरीप्रमाणे बांधकाम सुरू झाले. हे म्हणणे खरे आहे की त्यांनी ते शासकीय नियमानूसार बांधकाम केले.

६. हे म्हणणे खरे नाही की यादवराव दुधुके व मनोहर बावणे यांचे पटत नाही. साक्षीदार स्वत: सांगते की घर बांधकामामुळे त्यांचे आता पटत नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी बांधत असलेले घर वादीला आवडले नसल्याने त्यांनी ग्रामपंचायतीकडे, पंचायत समितीकडे तक्रारी केल्या. हे म्हणणे खरे नाही की मी व यादवराव यांनी खोटया तक्रारी दिल्या. ग्रामसचिव कोणत्या दिवशी मनोहर यास तुमचे बांधकाम चुकीचे आहे असे सांगितले ती तारीख मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की ग्रामसचिव मनोहर बावणे यांच्या बांधकामाला कधीही आला नाही व त्यांने बांधकाम चुकीचे आहे असे कधीही न म्हणाल्याने मी ग्रामसचिव कोणत्या दिवशी आला हे आता सांगू शकत नाही किंवा प्रतिज्ञापत्रातही लिहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की गावातील प्रतिष्ठीत लोकांनी मनोहर याला समजवून सांगितले मात्र त्यानी ऐकले नसल्याचे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की सरतपासातील संपूर्ण मजकूर मी खोटे सांगते आहे. हे म्हणणे खरे नाही की आम्हाला दुस–याच्या घरातूल जावे लागते हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

MOHAN RAMCHANDRA KAMAT
Digitally signed by MOHAN RAMCHANDRA KAMAT
Date: 2025.01.23 11:27:16 +0530

कामठी
दिनांक २१/०१/२०२५

( एम.आर. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी